● मंगळवार, दि १ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ७० वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मराठा-कुणबीचे ५४ लाख पुरावे!

## शिंदे समितीचा दुसरा, तिसरा अहवाल सरकारने स्वीकारला; मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई -** मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारनं नेमलेल्या शिंदे समितीचा अहवाल राज्य सरकारने सोमवार (दि ३०) रोजी स्वीकारला आहे. शिंदे समितीच्या अहवालात सापडलेल्या पुराव्यांची संख्या ५४ लाख ८१ हजार ४०० इतकी असल्याचे एका वृत्त वाहिनीच्या हाती लागलेल्या अहवालातून समोर आले आहे. सार्वजनिक दस्तावेजात कुणबी, कुणबी मराठा आणि मराठा कुणबीचे पुरावे सापडल्याचे शिंदे समितीच्या अहवालात नमूद असल्याचा दावा वृत्तवाहिनीने केला आहे.

मराठा आरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल स्वीकारला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला. माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी हिवाळी अधिवेशनात दुसरा अहवाल सरकारला दिला होता. तो दुसरा अहवाल आणि कमिटीने दिलेला तिसरा अहवाल कॅबिनेट बैठकीत ठेवण्यात आला होता. हे अहवाल स्वीकारल्यानंतर मराठा आरक्षणासंदर्भात सह्याद्री अतिथिगृहावर बैठकही पार पडली. या बैठकीला शंभुराज देसाई, चंद्रकांत पाटील आणि इतर महत्वाचे सरकारी अधिकारी हजर होते.

सन १९८६ ते २३ ऑक्टोबर २०२३ पर्यंत एकूण ३७ लाख ४७ हजार १५० जात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहेत. २४ ऑक्टोबर २०२३ पासून ते २१ डिसेंबर २०२३ या काळात ४३ हजार ९७४ जात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहेत असं या अहवालात म्हटलं आहे.

शिंदे समितीचा अहवाल समोर आल्यानंतर त्यावर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मराठा आणि कुणबी एकच आहेत हे सिद्ध करण्यासाठी सरकारला अजून किती पुरावे हवेत असा सवाल त्यांनी विचारला.

मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती शिंदे समितीने आपला दुसरा अहवाल डिसेंबर २०२३ मध्ये शासनास सादर केला होता.

हा अहवाल सादर करताना समितीने पूर्ण महाराष्ट्रभर दौरे केले. विविध जिल्हाधिकारी त्यांच्या इतर समित्या इतर अधिकारी यांच्याशी चर्चा करून शोधलेले कागदपत्रे आणि त्या अनुषंगिक बाबीवर त्यांना निष्कर्ष आणि जी निरीक्षणे दिसली त्याच्या आधारे अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये १४ शिफारशी शासनास सादर करण्यात आल्या होत्या. या शिफारशींवरील कार्यवाहीबाबत विविध विभागांना आजच्या बैठकीत निर्देश देण्यात आले.

जिल्हा प्रशासनाने प्रमाणित केलेल्या तथ्य आणि आकडेवारीवरून महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक दस्तऐवजात कुणबी, कुणबी मराठा, मराठा कुणबी या जातीचे कागदोपत्री व पुरावे सापडलेले आहेत. त्याची संख्या ५४ लाख ८१ हजार ४०० इतकी आहे.

---

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण

## ‘गायरान आमच्या हक्काचे नाही कोणाच्या बापाचे’; घोषणाबाजी



### माजीमंत्री अर्जुनराव खोतकरांची उपोषणस्थळी भेट; कास्तकऱ्यांना सातबारा द्या - ॲड. भास्कर मगरे

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात गायरान धारकांना सातबारा देण्याच्या मागणीसाठी गायरान, कास्तकर भुमिहिनांचे नेते तथा शिवसेनेचे दलित आघाडीचे जिल्हा प्रमुख भास्कर मगरे यांनी लाक्षणिक उपोषण केले. जिल्हाभरातून आलेल्या गायरान,भुमिहिन, कास्तकारांनी प्रचंड घोषणाबाजी केली, गायरान आमच्या हक्काचे नाही कोणाच्या बापाचे...सातबारा देत कसे नाहीत सातबारा घेणारच अशा घोषणा दिल्याने जिल्हाधिकारी परिसर दणाणून सोडला होता. यावेळी माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी उपोषणस्थळी भेट देवून गायरान, भुमिहिन, कास्तकरांशी संवाद साधला.

दलित आदिवासी कास्तकर्यांचे जे अतिक्रमण शासन निर्णयानुसार त्यांना कायदेशीर करून सातबारा देण्यात यावा,दलित आदिवासींचा सातबारा हा कॉम्पुटराईजल करण्यात पान २ वर

---

विविध योजनेतील लाभार्थ्यांना लाभ प्रमाणपत्राचे वाटप

## महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी आपण सदैव पुढाकार घेतला - आ.बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील संजय गांधी निराधार, श्रावण बाळ योजने अंतर्गत १३०० पेक्षा अधिक लाभार्थ्यांना पेन्शन मंजूर करण्यात आली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले.

ते परतुर येथील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्य ग्रहामध्ये संपन्न झालेल्या, संजय गांधी श्रावण बाळ निराधार योजनेतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप व महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटांना कर्ज वाटप प्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की

या लाभार्थ्यांमध्ये ६५ वर्षे वयापेक्षा अधिक वय असणारे वयोवृद्ध, निराधार, विधवा, दिव्यांग, परित्यक्ता, दुर्धर आजारग्रस्त यांचा समावेश असून श्रावण बाळ, संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तीवेतन यासह विविध योजनातील लाभार्थ्यांना याचा लाभ होणार असून गेल्या पंचवार्षिक पासून आपण स्वतः लक्ष घालून १७००० च्या वर लाभार्थ्यांना पेन्शन सुरू करून दिले असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की

महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत बालसंगोपन योजनेअंतर्गत परतुर मंठा व जालना तालुक्यातील ६०० पेक्षा अधिक अनाथ बालकांना ज्यांना आई किंवा वडील नाही किंवा दोन्हीही नाही अशा अनाथ बालकांना त्यांचा शैक्षणिक खर्च व उपजीविका



भागवण्यासाठी प्रति महिना २२०० रू उपलब्ध करून देण्यात आला आहे त्यासाठी गटशिक्षणाधिकारी अंगणवाडी कार्यकर्ता अंगणवाडी मदतनीस यांच्यासह लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकाऱ्यांनी खूप मोठी मदत झाली असून या मुळे खऱ्या अर्थाने अनाथांना आधार मिळाला असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, महिला सक्षमीकरणाचे धोरण डोळ्यासमोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून आपण स्वतः या महिला बचत गटांना सक्षम बनवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत त्याचाच एक भाग म्हणून महिला बचत गटांना कर्ज प्रकरणे मंजूर करून सक्षम बनवण्याचा सातत्याने प्रयत्न करत आलो आहे यावर्षी देखील परतूर मंठा व जालना तालुक्यातील शेकडो बचत गटांना ५ कोटी रुपयांपेक्षा अधिक कर्ज मंजूर करण्यात आले आहे त्यातील आष्टी पान २ वर

---

युवा आदर्श

### कामाख्यीदेवी ...

कामाख्यी देवीदर्शन
भाग्य भले फळले
धावाधाव पळापळ
आरिष्ट दुर्धर जळले
मंगेशी माता दर्शना
पाऊल जसे वळले
आधीचं झाली कृपा
शुभ संकेत कळले
अमावस्या संपवली
काळे दिस ते पळले
मुंबादेवता सुप्रसन्न
कर अलगद जुळले
सत्तादेवी अधिष्ठीत
सिंहासन उजळले
कृपा प्रसादे न्हाहले
नशीब जे काजळले
वैर दुश्मनी संपवावी
करावे जनतेचे भले
सत्ताधारी विरोधक
साथी बनावे चांगले

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

## ‘उमेद’ आंदोलनाला भास्कर दानवे यांची भेट



**जालना । प्रतिनिधी -** शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालय अंतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हा स्वंतत्र कायमस्वरुपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन सर्व कार्यरत कंत्राटी अधिकारी, कर्मचारी यांना शासनाच्या समकक्ष पदावर कायमस्वरुपी सेवेत समाविष्ट करुन घेण्याबाबत उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटना, जिल्हा जालना च्या वतीने आज (३०) जालन्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे पान २ वर

---

## अर्जुनराव खोतकरांकडून ‘उमेद’

### मागण्या मंजूर करण्यासाठी मुख्यमंत्र्याकडे पाठपुरावा करु - खोतकर

जालना । प्रतिनिधी - विविध मागण्यासाठी उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटना जालना जिल्हा शाखेच्या वतीने सोमवार (दि ३०) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले या आंदोलनास माजी राज्यमंत्री तथा शिवसेनेचे नेते अर्जुनराव खोतकर यांनी भेट देत मागण्या मंजुर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगत ‘ना उमेद’ होऊ देणार नसल्याचे आश्वासन दिले.



उमेद राज्य महिला व कर्मचारी संघटनेच्यावतीने उमेद ही बचत गटासाठी महत्त्वाची योजना असून या योजनेला अंगणवाडी कर्मचाऱ्यांसारखा दर्जा देण्यात यावा, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घ्यावे, अभियानातील कर्मचाऱ्यांची अंतरजिल्हा बदली करावी, ग्रामविकास मार्फत स्वतंत्र विभाग सुरु करावा यासह इतर मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले. प्रसंगी पान २ वर

---

सतीश घाटगे यांचा पुढाकार

## शहागड बसस्थानकात सार्वजनिक शौचालयासाठी दिला निधी



**शहागड । प्रतिनिधी -** येथील एसटी बस स्थानकात सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने स्थानिकांसह प्रवाशांची कुचंबना होत होती. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतीश घाटगे यांनी शासनाकडे प्रयत्न करून आवश्यक निधी उपलब्ध दिला. त्यामुळे स्थानिक नागरिक व प्रवाशांची अनेक वर्षाची मागणी पूर्ण झाली. या स्वच्छतागृहाचे काम सोमवारी पान २ वर

---

## सावरगाव - रामनगर येथील कार्यकर्ते शिवसेनेत

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदारसंघातील सावरगाव रामनगर येथे असंख्य कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यावेळी उपस्थितांना सरकारच्या कल्याणकारी योजनांबद्दल सोप्या पद्धतीने समजावून सांगितले व मी आणि माझे शिवसैनिक सामान्य जनतेच्या सुख-दुःखात नेहमी खंबीरपणे उभे आहोत, असा विश्वासही यावेळी श्री खोतकर यांनी पक्षप्रवेश करणाऱ्यांना दिला.



याप्रसंगी युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले, संजय बप्पा शेजुळ, किसनराव डवले, कृष्णादादा डोंगरे, बापुराव राजे जाधव, तालुका प्रमुख भगवानराव अंभोरे, युवासेनेचे दोन्ही तालुका प्रमुख नागेश डवले पाटिल , राहुलभाऊ गवारे, साळेगावचे सरपंच संदिप घारे, सिरसवाडी सरपंच रवींद्र ढगे, विष्णुपंत ढोकळे, राजेभाऊ शेजुळ, नाथा सोनुने, सुनिल कांबळे, सलमान कुरेशी, गणेश डवले यांची उपस्थिती होती. प्रवेश करणाऱ्यांमध्ये मधुअण्णा शिंदे, पान २ वर

# संपादकीय

## महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज १०५ वि जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजनेतील लाभामध्ये दुप्पट वाढ; उत्पन्नाची अट रद्द,

### कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

**मुंबई -** कृषी विभागाच्यावतीने अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत घटकांचे सुधारित निकष निश्चित करून आर्थिक लाभ वाढवण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी सिंचनाच्या शाश्वत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २०१७ पासून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्हा परिषदेचा निधी वितरित करण्यात येतो. रोजगार हमी योजनेअंतर्गत नवीन विहिरीसाठी चार लाख रुपये अनुदान दिले जाते. मात्र त्या तुलनेत या योजनेतील लाभ घेण्यास लाभार्थी इच्छुक नसल्याचे दिसून आल्याने कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी योजनेतील लाभ वाढविण्याचे प्रस्तावित केले होते.

या योजनेचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी दीड लाख वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे. तसेच विहिरीच्या खोलीची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे या योजनेचा लाभ घेण्यासाठी असलेल्या अनेक तांत्रिक अटींमध्ये भरपूर सवलती देण्यात आलेल्या आहेत.

मंत्रिमंडळाच्या मान्यतेमुळे आता अनुसूचित जाती नव बौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांना नवीन सिंचन विहिरीसाठी २.५ लाख ऐवजी ४ लाख रुपये मिळतील. जुनी विहीर दुरुस्त करण्यासाठी ५० हजार ऐवजी १ लाख रुपये मिळतील. शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण करण्यासाठी १ लाख ऐवजी २ लाख मिळतील.

# देशी गायीला राज्यमाता- गोमाता दर्जा; राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय


### पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती; देशी गायींच्या पालन पोषणासाठी अनुदान

**मुंबई । प्रतिनिधी -** भारतीय संस्कृतीत गायीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे,देशी गायीला राज्यमाता-गोमाता घोषित करण्याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आल्याची माहिती, पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. मंत्री श्री. विखे पाटील यांनी सर्व मंत्रिमंडळातील सहकारी मंत्र्यांचे आभार व्यक्त केले.

गोशाळांमधील देशी गायींच्या पालन-पोषणासाठी प्रति दिन, प्रति गाय पन्नास रुपये अनुदान योजना राबवण्याचा निर्णय देखील मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

देशी गायीच्या दुधाचे मानवी आहारात पौष्टीकदृष्ट्या अधिक मूल्य आहे. देशी गायींच्या दुधात मानवी शरीर पोषणासाठी महत्त्वाचे अन्नघटक उपलब्ध असल्याने ते पूर्ण अन्न आहे. देशी गायींच्या दुधाचे मानवी आहारातील स्थान, आयुर्वेद चिकित्सा पध्दतीत पंचगव्याचा वापर तसेच सेंद्रिय शेती पध्दतीत देशी गायींच्या शेण व गोमुत्राचे महत्व आहे.

राज्यातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या देशी जातींच्या गायी आढळतात. मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी, पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ अशा जाती आहेत. वैदिक काळापासून गायीचे धार्मिक, वैज्ञानिक व आर्थिक महत्वामुळे गायीला कामधेनू संबोधले



जाते. परंतू मागील काही काळापासून देशी गायींच्या संख्येत होणारी घट ही चिंताजनक बाब ठरत आहे. यामुळे देशी गायींचे संगोपन व संवर्धन करणे गरजेचे असल्याने देशी गायींच्या पालनपोषण करण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी शासनाने देशी गायीला यापुढे राज्यमाता- गोमाता घोषित करण्यास मान्यता दिली. राज्यात देशी गायीला विशेष दर्जा दिल्याने देशी गायीच्या गोवंश संवर्धनास प्रोत्साहन मिळणार आहे.

**देशी गायींच्या पालन पोषणासाठी अनुदान**

राज्यातील गो शाळांमधील देशी गायींच्या पालन-पोषणासाठी प्रति दिन, प्रति गाय पन्नास रुपये अनुदान योजना राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. गोशाळांना अत्यल्प उत्पन्न असल्याने आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने, हा निर्णय घेण्यात आला. या योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडून करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा गोशाळा पडताळणी समिती असेल. २०१९ मधील २० व्या पशु गणनेनुसार देशी गायींची संख्या ४६ लाख १३ हजार ६३२ इतकी कमी असल्याचे आढळून आले आहे. ही संख्या १९व्या पशुगणनेशी तुलना करता २०.६९ टक्क्यांनी कमी झाली आहे.

# आयुष उपचार प्रणालीमुळे वैद्यकीय पर्यटनाच्या क्षेत्रात जगात भारताला विशेष स्थान - केंद्रीय आयुष व आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव

**मुंबई । प्रतिनिधी -** भारताचा वैद्यकीय पर्यटनाचा दृष्टीकोन केवळ शारीरिक उपचारांपुरता मर्यादित नाही, तर त्यात मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्याचाही समावेश आहे. आयुष प्रणालीमुळे भारताला जगभरातील वैद्यकीय पर्यटनाच्या क्षेत्रात एक विशेष स्थान आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष व आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज येथे केले.

केंद्रीय आयुष राज्यमंत्री श्री. जाधव म्हणाले, लवकरच राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये आयुषच्या १७० हून अधिक आजारांवरील उपचाराच्या पॅकेजेसचा समावेश करण्यात येणार आहे. मंडळ, तहसील स्तरावर आयुष औषध केंद्रे उघडण्यात येणार आहे. यामुळे आयुर्वेदासह आयुषच्या सर्व यंत्रणांची सर्व औषधे एकाच ठिकाणी स्वस्त दरात उपलब्ध होतील. सर्वप्रथम आयुष जन औषधी केंद्र ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद, दिल्ली उघडण्यात येणार आहे.

बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील हॉटेल सेफिटेलला आयोजित 'आयुष मेडिकल व्हॅल्यू ट्रॅव्हल' संमेलनात केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव बोलत होते. कार्यक्रमास केंद्रीय आयुष विभागाचे सचिव राजेश कोटेचा, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनचे अध्यक्ष देवेंद्र त्रिगुणा, आयुष विभागाचे सल्लागार डॉ. मनोज नेसरी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, पश्चिम विभागातील विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणारे सर्व वरिष्ठ अधिकारी, विविध देशांच्या वाणिज्य दूतावासांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव म्हणाले, भारताची नैसर्गिक विविधता स्वतःच अद्वितीय आहे. या विविधतेमध्ये वसलेली आयुर्वेद वैद्यकीय केंद्रे आणि शांततापूर्ण योग आश्रम शतकानुशतके विविध रूची असलेल्या परदेशी नागरिकांना आकर्षित करत आहेत. आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी (आयुष) च्या सर्वांगीण पद्धती निरोगी पर्यटनाच्या तत्त्वांशी परिपूर्ण सुसंगत आहेत, ज्यामुळे जगभरात असलेल्या भारतातील अभ्यागतांना एक प्रामाणिक आणि समृद्ध अनुभव मिळतो. रोगांच्या सर्वांगीण उपचारांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे, सर्वसमावेशक आणि कायमस्वरूपी उपाय शोधणाऱ्या लोकांसाठी आयुष प्रणाली आकर्षणाचे केंद्र बनत आहे.




दरवर्षी अमेरिका, युरोप, रशिया, युरेशियन देश, मध्य पूर्व आणि इतर प्रदेशातून हजारो परदेशी पर्यटक आयुर्वेदिक उपचारांचा लाभ घेण्यासाठी भारतात येतात. आयुष वैद्यकीय प्रणालींची मागणी गेल्या दशकात अनेक पटींनी वाढली आहे, परिणामी अनेक रुग्णालयांनी त्यांच्या वैद्यकीय चौकटीत आयुर्वेद आणि आयुष सेवांचा समावेश केला आहे. आयुष सेवा आणि त्यांची मानके सुनिश्चित करण्यासाठी भारत सरकारने अनेक महत्त्वाच्या उपाययोजना केल्या असल्याचेही त्यांनी सांगितले. यावर्षी २९ ऑक्टोबर २०२४ रोजी धनत्रयोदशीचा सण साजरा केला जाणार आहे. हा सण भगवान धन्वंतरीचा जन्म दिवस म्हणून साजरा केला जातो. आयुष मंत्रालयाच्या पुढाकाराने, भारत सरकारने धनत्रयोदशी हा आयुर्वेद दिवस म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू केली आहे. या वर्षी आयुर्वेद दिनाचे ९ वे वर्ष आहे आणि त्याची संकल्पना जागतिक आरोग्यासाठी आयुर्वेद नवकल्पना आहे, या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावाचे म्हणजेच शारीरिक आणि मानसिक रचनेचे आयुर्वेदिक शास्त्रीय विश्लेषण करण्याच्या उद्देशाने सरकारने देशभरात देश का प्रकृती परिक्षण मोहीम सुरू केली आहे. भारताने पारंपरिक प्रणालींना आधुनिक वैद्यकासोबत जोडण्यात यश मिळविले आहे, ज्यातून इतर देशांनाही प्रेरणा मिळू शकते आणि हे मॉडेल स्वीकारले जाऊ शकते, जे जगभरातील आरोग्य सेवांमध्ये क्रांती घडवू शकत असल्याचा विश्वासही केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री श्री. जाधव यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला आयुष मंत्रालय व आरोग्य मंत्रालयाचे अधिकारी उपस्थित होते.

पान १ वरुन

## गायरान आमच्या ...

यावा. जेणेकरून बँक त्यांना कर्ज देईल,त्यामुळे प्रशासनाने तात्काळ निर्णय घेवून माझ्या भुमिहिन, कास्तकरांना सातबारा देण्यात यावा, अशा विविध मागण्यांसाठी भास्कर मगरे यांनी आज ३० सप्टेंबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले. दरम्यान आतापर्यंत २५ हजार नोटीसीचे उत्तर मी दिल्याचे ॲड. मगरे यांनी सांगून जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी भूमिहीन कास्तपट्टे नावे करुन सातबारा देण्यात यावा मागण्यांसह विविध मागण्यांसाठी शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख अ?ड. भास्करराव मगरे यांनी आंदोलने, मोर्चे, जालना ते मुंबई असे मोर्चे काढलेले आहे. अद्यापही त्यांच्या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधले नसल्याने शेवटी मगरे यांनी एक दिवशीय लाक्षणिक उपोषण करुन शासनाचे लक्ष वेधले.

जिल्हाधिकार्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाडा विशेषतः जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तपट्टे नावे करुन सातबारा देण्यात यावा, राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तकरांना शासनाने प्रदान केलेल्या गायरान जमीनी सिलींग ॲक्टमधील शेत जमीनी, इनामी जमीनी आदी संगणकीय सातबारा करुन लाभार्थ्यांचे नावासमोरील क्षेत्र पोट खराबीमध्ये दाखवत असल्याने लाभार्थ्यांना शासकीय मदतीशिवाय बँकेच्या कर्जापासून वंचित राहावे लागत आहे, त्यामध्ये दुरुस्ती करुन सातबारा क्षेत्र पूर्ववत करण्यात यावे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमानी योजनेची प्रभावीपणे प्रशासकीय स्तरावर अंमलबजावणी करण्यात यावी, शासनाने घरकुल आवास, रमाई आवास, शबरी घरकुल, पारधी आवास, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनासाठी प्रधानमंत्री आवास योजनेतून सर्वांसाठी घरे- २०२२-२४ नुसार उपेक्षित समाजातील वंचित घटकाला विशेष प्राधान्य देण्यात यावे, निराधार योजनेतून निराधारांना मासिक देय अनुदान दीड हजारांऐवजी तीन हजार रुपये देण्यात यावे. मौजे पाणशेंद्रा ग.नं. ९ एकुण क्षेत्र ४५.७१ हे. जमीनीवर स्थानिक आदिवासी भुमिहिनांचे अतिक्रमण ४० वर्षांपुर्वीचे आहे, काहींना सातबारा वर घेतले आहे काहींची नोंद नाही, न्याय प्रविष्ठ प्रकरणात शासनाने हस्तक्षेप न करता सातबारा देण्यात यावा. मौजे गणेशनगर ग.न. ६९ (गायरान) न्याय प्रविष्ट प्रकरणात स्थानिक आमदारांनी हस्तक्षेप करु नये. जिल्हाधिकारी जालना यांचे २३ जानेवारी २००६ आदेशानुसार मौजे रामनगर (सावरगाव हडप) ता.जि.जालना येथील ग.न. २०० (गायरान) जमीनीवरील लाभार्थी यांचे अतिक्रमण नियमानुकूलित करुन सातबाराला नोंद घेण्याचे निर्देश देवून तहसिलदार जालना यांनी डिसेंबर २०२३ मध्ये ८ बेकायदेशिर लोकांच सातबारा उतार्यांवरील नावे कमी करण्याचेही निर्देश देण्यात यावेत, असेही भुमिहिन, कास्तकरांचे नेते ॲड. भास्करराव मगरे यांनी सांगितले.

प्रचंड कडक ऊन असूनही जिल्हाभरातून आलेल्या भुमिहिन, कास्तकरांनी अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने उपोषणस्थळी दाखल झाले. यावेळी जिल्हाधिका री कार्यालयासमोरील संपुर्ण भाग भुमिहिन कास्तकरांनी भरुन गेला होता.

## महिला बचत ..

येथील १ कोटी १० लक्ष रुपयाच्या कर्जाचे वितरण आष्टी येथे करण्यात आले होते तर आज परतुर येथे ०१कोटी १० लक्ष रुपयांच्या धनादेशाचे वितरण होत असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार लोणीकर म्हणाले की, केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार व राज्यातील एकनाथ शिंदे देवेंद्रजी फडणवीस अजित दादा पवार यांच्या नेतृत्वातील सरकार हे शेतकरी कष्टकरी सर्वसामान्य महिला या सर्व स्तरातील जनसामान्यांसाठी काम करणारी सरकार असून लाडकी बहिणी योजनेच्या माध्यमातून परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये एक लाखाच्या वर महिलांना या योजनेचा लाभ मिळाला असल्याचे यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले

आज माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते आर्थिक विकास महामंडळाच्या

कुंकू सौभाग्य महिला बचत गट शिरसगाव ०५ लक्ष रुपये, अभिनव महिला बचत गट परतुर ४ लक्ष रुपये, क्रांती महिला बचत गट ९ नऊ लक्ष रुपये, अहिल्या ज्योती महिला बचत गट ५ लक्ष रुपये लक्षपत महिला बचत गट ७ लक्ष ५०हजार रुपये लक्ष पद महिला बचत गट ७ लक्ष ५० हजार रुपये, बागेश्वरी महिला बचत गट परतुर ४ लक्ष ९० हजार रुपये, रेणुका माता महिला बचत गट ३ लक्ष रुपये, भीमशक्ती महिला बचत गट ७ लाख रुपये, वैष्णोदेवी महिला बचत गट ९ लक्ष रुपये, राजमाता महिला बचत गट ०४ लक्ष रुपये, तुळजाभवानी महिला बचत गट ४ लक्ष रुपये, कोकेश्वरी महिला बचत गट परतुर ३ लक्ष ४७००० रुपये, फलक महिला बचत गट ७ लक्ष रुपये, द्यानेश्वर महिला बचत गट ४ लाख रुपये सरस्वती महिला बचत गट ५ लक्ष रुपये आधी बचत गटांना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते धनादेशाचे वितरण करण्यात आले

यावेळी कार्यक्रमाला भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे रमेश भापकर, पद्माकर कवडे संभाजी वारे रवींद्र सोळंके, निवृत्ती लाटे, दिगंबर मुजमुले, रंगनाथ येवले, गजानन लोणीकर गजानन लिपणे गणेश सोळंके रमेश राठोड रमेश राठोड बंडू मानवतकर बाबाराव थोरात श्री गांजाळे सिताराम राठोड, सनी तनपुरे, मधुकर मोरे नसरुला काकड आसिफ कच्ची बबलू सातपुते, माऊली सोळंके, तहसीलदार प्रतिभा गोरे, गटविकास अधिकारी राजेंद्र तांगडे महिला आर्थिक विकास महामंडळाचे उमेश कहाते शैलेश उखळकर सुषमा कुलकर्णी मनीषा कुलकर्णी उज्वला खरात मंगल साकळकर मनीषा हनवते ज्योती नाटकर सुनयना बदनेकर अर्जुन लाये सीमा नाईक संगीता दहिभाते अश्विनी गंगणे यांच्यासह गावागावातून आलेले सरपंच उपसरपंच लाभार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## उमेद आंदोलनाला ...

यांच्यावतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन करुन केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वात शेवटपर्यंत मागण्यांचा पाठपुरावा करू असे आश्वासन दिले.

याप्रसंगी उमेद संघटनेतील संगीता घोडके, संगीता शिंदे, मीना कठोरे, सुनीता कठोरे, गणेश तिडके, माया हुसेके (भोकरदन) सुनिता चव्हाण (घनसावंगी) अलका काढवदे (अंबड) यांच्यासह भाजप जिल्हासरचिटणीस सिद्धिविनायकजी मुळे, तालुका अध्यक्ष वसंतराव शिंदे, निवृत्ती लंके, गोवर्धन कोल्हे यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अर्जुनराव खोतकरांकडुन...

माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. तसेच आंदोलकांच्या शिष्टमंडळासह चर्चा केली. शिष्टमंडळासह जिल्हाधिकारी यांची भेट घेत जिल्हाधिकाऱ्यासमवेत चर्चा केली. आंदोलनकर्त्यांना आश्वस्त करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागण्यांचा पाठपुरावा करणार असल्याचे श्री खोतकर यांनी सांगितले. खोतकरांनी दिलेल्या आश्वासनानंतर आंदोलनकर्त्यांना आता त्यांच्याकडून मागण्या मान्य होण्याची 'उमेद' आहे.

यावेळी यावेळी युवा सेनेचे अभिमन्यू खोतकर, जालना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, तालुकाप्रमुख भगवान अंभोरे, युवासेना तालुकाप्रमुख राहुल गवारे आदींची उपस्थिती होती.

## शहागड बस ...

सतीश घाटगे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरु झाले.

शहागड बस स्थानकातील सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीच्या कामास सुरुवात झाल्याने शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत सतीश घाटगे यांचे आभार मानले. यावेळी शहागड येथील सर्व प्रतिष्ठित व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, अल्पसंख्याक विभागाचे नजीर शहा आसेफ कुरेशी, इम्रान खान, जमिरोद्दिन भाई, अशोकराव बोधे, इक्बाल बागवान, निसार कुरेशी , सुभाष उमरे , अब्दुल कुरेशी , नावेद कुरेशी, सर्फराज कुरेशी, मागुत कुरेशी, अन्वर शहा, जावेद बागवान, सलीम बागवान, फेरोज कुरेशी,फारूक कुरेशी, प्रकाश खाराद आदी उपस्थित होते.

## सावरगाव - रामनगर ...

आबा काकडे, विठ्ठल श्रीखंडे, सुधाकर शिंदे, जना अहिरे, उदावंत कृष्णा, सचिन शिंदे, शिवाजी गाडेकर, आबा खांडेभराड, गंगाधर गोरे, गोवर्धन गायकवाड, दशरथराव मोजपुरी यांसह असंख्य कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

# किड्स चॅम्पियन राष्ट्रीय स्पर्धेत ओवी मांगडे हिला सुवर्णपदक



**जालना । प्रतिनिधी -** नाशिक येथे २० ते २२ सप्टेंबरदरम्यान पार पडलेल्या पहिल्या किड्स चॅम्पीयन ऑफ चॅम्पीयन राष्ट्रीय स्पर्धेत जालना येथील एम. डी. स्पोर्टस अॅकॅडमीची खेळाडू ओवी अनिल मांगडे हिने ९ वर्ष वयोगट व २५ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे.

या स्पर्धेत देशभरातून ५०० पेक्षा अधिक खेळाडू सहभागी झाले होते. या यशाबद्दल अॅकॅडमीचे प्रशिक्षक आणि संचालक ज्ञानेश्वर मोरे, वडील अनिल मांगडे आई गीता मांगडे, जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद देशमुख, सचिव सचिन आर्य, प्रशिक्षक मयुर पिवळ, सचिन गादेवाड, प्रतिक ढाकणे, आकाश उघडे, शरद जाधव, श्री तुळजा भवानी माता मंदिर संस्थानचे अध्यक्ष राम महाराज शिंदे यांनी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# खोरवड येथील तरुणांचा शिवसेनेत प्रवेश

## शिवसेना तालुकप्रमुख उदयसिंह बोराडे यांची प्रमुख उपस्थिती

**मंठा । प्रतिनिधी -** आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात वातावरण निर्मितीस सुरुवात झाली असून राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विविध राजकीय पक्षांतील राजकीय पदाधिकाऱ्यांची पसंती शिंदेंच्या शिवसेनेला मिळतांना दिसत आहे. पंधरवड्यात पाचवी इनकमिंग तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन रविवार ( दि.२९ रोजी) शिवसेना संपर्क कार्यालयात पार पडली.



खोरवड येथील विजय शिंदे, रंगनाथ चव्हाण, कैलास कांगणे, कृष्णा उदावंत, गोविंद चव्हाण, लक्ष्मण चव्हाण, किरण चव्हाण, रमेश चव्हाण, भागवत चव्हाण, जीवन निकाळजे, गोरख टाक, राधेश्याम चव्हाण, जीवन कांबळे, काशिनाथ चव्हाण, शुभम चव्हाण, गजानन चव्हाण, गौतम चोरमारे यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी युवासेना उप जिल्हाप्रमुख योगेश गणगे, दलीत आघाडी उपजिल्हा प्रमुख नितीन मोरे, उपशहर प्रमुख दत्तात्रय बोराडे, अमोल विरकर, हलीम कुरेशी, माऊली वायाळ, कैलास बनकर, पत्रकार विवेक भुतेकर व इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थीती होती.

## केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांचा दौरा

**जालना । प्रतिनिधी -** देशाचे आयुष (स्वतंत्र पदभार), आरोग्य आणि कुटूंब कल्याण केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. मंगळवार दि.१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ५.१३ वाजता जालना रेल्वेस्थानकावर आगमन व जालना येथून मेहकरकडे प्रयाण करतील.



**संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ राज्य सरकारने मंजुरी दिल्याबद्दल सोनार समाजाच्या वतीने काद्राबाद चौक येथे फटाके, अतिष बाजी, व एकमेकांना बुंदीचे लाडू आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ऑल इंडिया सोनार फेडरेशन अध्यक्ष मोहन हिवरकर, सुरेंद्र शेडूते, महेश दुसाने, राम लोडगे, राजेश पडोळे, रुपेश विसपुते, भगवान शेडुते, चेतन,सुवर्णकार, पंकज ढाळे, सुनील दहिवाळ, मुकुंद दहिवाळ, विजय विसपुते, सूर्यप्रकाश, उदावंत, आकाश कुलथे, योगेंद्र शेडूते, जगदीश वर्मा, प्रशांत कुलथे, सतीश टेहरे, अंकुश पडूळ, दगडू उदावंत, विष्णू टेहरे, निवृत्ती बोकन, रविचंद्र खर्डेकर, राम शेडुते, आनंद श्रीमाळी, वेंकटेश सुवर्णकार, सुधीर शहाणे, बालाजी उदावंत, राहुल सुवर्णकार, अमित दुसाने, शरद बोकन, शरद ढाळे, कैलास शहाणे, गोपाल आर्य आदींची उपस्थिती होती. ( छाया/जावेद तंबोली)**

# जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

जालना । प्रतिनिधी - मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.११ ऑक्टोबर २०२४ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वत:चा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योग या बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे.या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे,कच्चा माल,साहीत्य,कॅप्रीसिटी,जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, राष्ट्रीय पशुधन योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.११ ऑक्टोबर २०२४ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.

### मांगरूळ बुद्धविहारात धम्म प्रवचन उत्साहात

# विज्ञानवादी बाबासाहेब हेच आधुनिक भारतातील खरे बुद्ध - प्रबोधनकार प्रा. भोसले





**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** पंचशील बौद्धजन सेवासंघ गोरेगाव विभाग, बौद्धजन पंचायत समिती गोरेगाव शाखा क्र. ८४१ /१ते ५ पंचशील महिला संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २१/९/२०२४ रोजी आयु. विकास गायकवाड ( डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठ लोणेरे माणगाव चे मा. कुलसचिव, सामाजिक कार्यकर्ते, समाज धुरीण लोक नेते ) यांच्या अध्यक्षते खाली वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे अकरावे पुष्प मांगरुळ बौद्धजन सेवा संघ स्थानिक व मुंबई (रजि) व रमाई महिला मंडळ स्थानिक यांच्या वतीने गुंफताना व्याख्याते, प्रबोधनकार वसंतराव नाईक महाविद्यालय म्हसळा येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. कानिफ भोसले यांनी विज्ञानवादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर प्रबोधनपर बोलताना म्हणाले की, जगातील पहिले आणि शेवटचे मानसशास्त्रज्ञ जर कोणी असेल तर ते आहेत तथागत भगवान गौतम बुद्ध, तथागतांचे तीन टप्पे सांगताना समजून घेणारे सिद्धार्थ गौतम हा एक टप्पा , त्यानंतर ज्ञानप्राप्ती झालेले म्हणजे सत्य उमजलेले सम्यक संबुद्ध हा दुसरा टप्पा व त्यानंतर वैरागी बुद्ध असे विविध टप्प्यातील बुद्ध सांगताना नेमके आधुनिक काळातील बुद्ध कोण हे सांगताना प्रा.भोसले पुढे म्हणतात कि ,२९ व्या वर्षी सत्य शोधणारे सिद्धार्थ गौतम तर ऐन तारुण्यात वीस - बावीस वर्षाचे भिमराव ५८ संस्थानांचा विरोध असताना व्हिक्टोरीया राणी च्या पुढे भारतातील लोकशाही मुल्ये रुजविण्यासाठी चा जाहीरनामा सादर करतात. अशी अनेक उदाहरणे देऊन बाबासाहेबांच्या राजकीय सामाजिक कायदेशीर कार्याचा धावता आढावा सांगून अतिशय मौल्यवान माहिती प्रबोधनकार प्राध्यापक कानिफ भोसले यांनी उपस्थितीत धम्म उपासक आणि उपासिकांना दिली.

सदर कार्यक्रमाच्या अल्पोपाहाराची व्यवस्था समाजातील दानशूर धम्म उपासक आयु. प्रमोद लोखंडे यांनी केली. सदर वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आयु. निखिल लोखंडे यांनी केले.

सदर वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रमला अध्यक्ष विकास गायकवाड, सचिव संदिप साळवी, डॉ. दिलीप साळवी, रामदास जाधव, बळीराम हाटे, शाखा क्र २ चे कोषाध्यक्ष राजू मोरे, शाखा क्र ३ चे सचिव विजय जाधव, एकचे अध्यक्ष प्रकाश जाधव, पंचशिल महिला संघाच्या अध्यक्षा सुप्रियाताई साळवी, सचिवा संघमित्रा गायकवाड, रेश्मा साळवी, अस्मिताताई जाधव, जाधव, नंदा मोरे वडगाव, उषाताई हाटे नागाव महिला संघ व मंदा मोरे कुरवडे महिला गोरेगाव विभागातील विविध गावातून उपासक उपासिका बहुसंख्येने उपस्थित होते. जेष्ठ सभासद व माजी अध्यक्ष आयु विश्राम लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते व माजी सचिव आयु तुकाराम लोखंडे, माजी उपाध्यक्ष आयु अनंत लोखंडे, मुंबई सचिव आणि पं.बौ.से.संघ विश्वस्त आयु संतोष लोखंडे, शाखा क्र.१८० मुंबई उपसचिव आयु प्रविण लोखंडे, उपाध्यक्ष आयु पांडूरंग लोखंडे, जेष्ठ सभासद आयु सिद्धार्थ लोखंडे, प्रकाश लोखंडे, मुंबई सक्रिय सभासद आयु महेंद्र लोखंडे, दानशुर व सक्रिय सहभाग आयु प्रमोद लोखंडे, बाविस प्रतिज्ञा अभियंताचे कार्यकर्ते आयु दिनेश लोखंडे, स्थानिक सचिव निखिल लोखंडे, पंकेश लोखंडे, राहुल लोखंडे, राजेंद्र लोखंडे, रितेश लोखंडे, पार्थ लोखंडे, मांगरुळ ग्रामपंचायत सदस्य सौ.अपर्णा लोखंडे, कल्पना लोखंडे, सुवर्णा लोखंडे, रोहिता लोखंडे, प्रफुल्ला लोखंडे, रंजना लोखंडे, मंगला लोखंडे, ऋतिका लोखंडे, विशाखा लोखंडे, रश्मी लोखंडे, सविता अ. लोखंडे, सविता ग. लोखंडे, उज्वला लोखंडे, सोनाली लोखंडे, आकाक्षा लोखंडे, प्रज्ञा लोखंडे इत्यादी उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# संत कक्कय्या विकास संस्था धारावी आणि तायाप्पा हरी सोनवणे सोशल फाऊंडेशन मुबंई यांच्या विद्यमाने संयुक्त जयंती सोहळा

**धारावी । प्रतिनिधी -** संत कक्कय्या विकास संस्था धारावी आणि तायाप्पा हरी सोनवणे सोशल फाऊंडेशन मुबंई यांच्या विद्यमाने संत कक्कय्या समाजाचे थोर सुपुत्र माजी खासदार लोकनेते कै. तायाप्पा हरी सोनवणे, माजी राज्यपाल, स्वातंत्र्य सैनिक कै गणपतराव देवजी तपासे व माजी आमदार, लेखक, पत्रकार, संपादक तसेच अष्टपैलू व्यक्तिमत्व स्वातंत्र्य सैनिक कै. नामदेवराव लक्ष्मण व्हटकर या त्रिमूर्तीचा संयुक्त जयंती सोहळा रविवार (दि २९) रोजी धारावीत मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी या त्रिमूर्तीच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. तसेच यावेळी कै. तायाप्पा हरी सोनवणे,कै गणपतराव देवजी तपासे,कै. नामदेवराव लक्ष्मण व्हटकर यांच्या परिवाराचा आणि सामाजिक शैक्षणिक, साहित्यिक अशा विविध क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या समाज बांधवाचा 'संत कक्कय्या महाराज सन्मानपत्र 'देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

तत्पूर्वी कै.तायाप्पा हरी सोनवणे,कै गणपतराव देवजी तपासे,कै. नामदेवराव लक्ष्मण व्हटकर यांच्या जीवनावर आधारित लेखक रमाकांत नारायणे लिखित कक्कय्या समाजातील त्रिरत्न या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले.तसेच या त्रिमूर्तीचा जीवनपट चित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आला.





सदर सयुक्त जयंती सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संत कक्कय्या विकास संस्था धारावी आणि तायाप्पा हरी सोनवणे सोशल फाऊंडेशन मुबंई यांनी आणि संयुक्त जयंती सोहळा समिती चे अध्यक्ष श्री राजेश खंदारे, उपाध्यक्ष श्री शिवाजी सोनवणे, सल्लगार सदस्य सूर्यकांत इंगळे, सल्लगार सदस्य गोविंद खरटमोल, सदस्य रमाकांत नारायणे, नरसिंग कावळे, अशोक इंगळे, शशिकांत पोळ, रुपचंद नारायणकर, हृदयनाथ खंदारे, विजय खंदारे, रुपेश शिंदे, सुभाष पोळ तसेच त्यांच्या इत्तर सर्व सदस्यांनी विशेष मेहनत घेऊन घेतली.सदर संयुक्त सोहळ्यासाठी मुबंई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, सांगली अशा विविध जिल्ह्यातून समाज बांधव मोठया संख्यने उपस्थित होते.

## सिद्धार्थ महाविद्यालयातील विद्यार्थी धावण्याच्या स्पर्धेत दुसरा

**जाफराबाद । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ( शै .वर्ष २०२४-२५)क्रीडा महोत्सवात सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद येथिल अभ्यास केंद्राचा विद्यार्थी गणेश निकस या विद्यार्थ्यांने ८०० मीटर व १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत पटकावला दुसरा क्रमांक.त्याच्या या यशामुळे संस्थेचे संस्थापक,अध्यक्ष या.दादासाहेब म्हस्के, संस्थेचे सन्माननीय सचिव मा.राहुलभाऊ म्हस्के, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.र.तु. देशमुख, उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. सुनिल मेढ, केंद्र संयोजक प्रा अनिल वैद्य, टेक्निशियन वैभव फदाट यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# विविध कार्यालय, आस्थापनांनी फलकासह मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नूसार जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, आस्थापना तसेच खाजगी दुकानांवरील फलक मराठी भाषेत लावण्याची कार्यवाही प्राधान्याने करावी. तसेच जिल्ह्यातील विविध कार्यालये, आस्थापनांनी फलकासह मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक आहे, अशा सुचना उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रमुख अधिकाऱ्यांना पत्रान्वये दिल्या आहेत.महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नूसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय कार्यालयातील मुळ प्रस्ताव, सर्व पत्रव्यवहार, टिपण्या, आदेश, संदेशवहन मराठी भाषेतच असतील. तर कार्यालयीन स्तरावरील सर्व प्रकारची सादरीकरणे व संकेतस्थळे मराठीत असतील. कार्यालयात मराठी भाषेतून संभाषण न करणाऱ्या शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्याबाबत संबंधित कार्यालय प्रमुख अथवा विभाग प्रमुखाकडे करता येईल. तसेच दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. मराठी भाषा धोरणाच्या जिल्हास्तरावरील अंमलबजावणीचे काम जिल्हास्तरीय मराठी भाषा समितीकडे सोपविण्यात येईल. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन महामंडळे, शासन अनुदानित कार्यालयामध्ये अभ्यागतांशी व अभ्यागतांनी मराठी भाषेतून संभाषण करणे अनिवार्य असेल. तसेच या प्रकारचा दर्शनी भागात फलक लावणेही कार्यालयास अनिवार्य असेल. शासन अंगीकृत उपक्रमातील उद्योगांकडून दिल्या जाणाऱ्या जाहिरातीमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य असेल. केंद्र सरकारची सर्व कार्यालये तसेच बँकामध्य दर्शनी भागात लावण्यात येणारे सूचनाफलक, अधिकाऱ्यांचे नामफलक, अर्ज नमुने मराठीतून असणे अनिवार्य करण्यात येईल. याप्रमाणे मराठी भाषा धोरणातील संबंधित मुद्दे आहेत. असेही कळविण्यात आले आहे.

## लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा घेणाऱ्यांविरोधात सरकारची कठोर पावलं!

**मुंबई । प्रतिनिधी -** महिला असल्याचे भासवून पुरुषांनीच लाडकी बहीण योजनेचे पैसे लाटल्याचा प्रकार समोर आला आहे. जवळपास ३८ खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाले आहेत. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा आता समोर आला आहे. यापूर्वीही असाच एक गैरप्रकार नवी मुंबईतून समोर आला होता. अशा प्रकारांमुळे सरकारमध्ये धास्ती वाढली असून सरकारने याविरोधात आता कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भातल महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी माहिती दिली. त्या आज माध्यमांशी बोलत होत्या.सरकारच्या विविध शासकीय योजनेतील आधार कार्डचा गैरवापर करून लाडकी बहीण योजनेसाठी एका व्यक्तीने ३७-३८ अर्ज भरले आहेत.

मंठ्यातील तळणी येथे सर्व रोगनिदान शिबिर

# ३५ गावातील २६ प्रकारांच्या आजारावरील रुग्णांना औषधोपचार

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील तळणी येथे सर्व रोगनिदान शिबिराचे ( ता . ३० ) रोजी आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन युवा मोर्चाचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. तर जालना येथील नवजीवन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. आशिष राठोड, तालुकाध्यक्ष सतीश निर्वळ, रा. यु. काँ. जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सरकटे, महेश पवार, कैलास चव्हाण, डॉ. किरण नांगरे, डॉ. रविंद्र देशमुख, डॉ . बालाजी भावसार, गजानन देशमुख, मनोज देशमुख, शरद पाटील, नितीन सरकटे, दारासिंग चव्हाण, गौतम सदावर्ते, विश्वनाथसिंह चंदेल, रितेश चंदेल यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.



तळणी येथील विठ्ठल रुक्माई मंदिरांत नवजीवन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल जालना व हॉटेल इंद्रायणी फॅमिली रेस्टॉरंट तळणी यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात तळणीसह ३५ गावांतील २६ प्रकारांचा आजारांवरील १ हजार रुग्णांची तपासणी करून मोफत औषध उपचार करण्यात आले. शिबिर यशस्वीतेसाठी हॉटेल इंद्रायणीचे संचालक अशोक राठोड, माणिक पवार, शंकर फड, शंकर आंधळे, गजानन गायकवाड, सत्संग राठोड, गणेश टेकाळे, कमल छेगी, विजय राठोड, रमेश दहिजे, सौ. निता राठोड, सागर सदावर्ते, चंदा पवार यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले. या शिबिरात डॉ. आशिष राठोड, डॉ. राजेश चव्हाण , डॉ. पुजा म्हस्के, डॉ. राहुल चव्हाण, डॉ. अजय पवार यांच्यासह राजेश जगदणे, पूजा आधुडे, शुभम जाधव, रितेश राठोड, कुंडलिक राठोड, अनिल जाधव, करण थोरात, अनिल मस्के यांचा समावेश होता.

### शिबीरात १ हजार रुग्णांना लाभ - डॉ. राठोड

या शिबिरात संधिवात, अनेमिया, व्हायरल फेवर, जॉईंट पेन, दमा, मधुमेह, रक्तदाब, डेंगू, टायफाईड, छाती, स्त्रीरोग, मासिक पाळीचे आजार, पोटाचे आजार, हाडाचे आजार यांच्यासह सर्दी, खोकला, घसा, कान, नाक, डोळे यांसह अन्य आजारांच्या जवळपास १ हजार रुग्णांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आल्याचे डॉ. आशिष राठोड यांनी सांगितले.

# क्लास वन अधिकारी दीपक सवडे यांचा मानव सेवा मंडळाच्या वतीने गौरव



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील अकोला देव येथील दीपक बाबुराव सवडे यांनी राज्यसेवा परीक्षेत २९ वी रँक मिळवून क्लास वन अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केल्याबद्दल टेंभुर्णी येथील मानव सेवा मंडळाच्या वतीने शनिवारी त्यांचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी दीपक सवडे यांचे वडील बाबुराव सवडे, आई नंदाबाई सवडे यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊराव आटपळे यांनी केले. याप्रसंगी त्यांनी सांगितले की अकोला देव गावातून मोठ्या प्रमाणावर युवक सैन्यामध्ये भरती झालेले आहेत. याशिवाय या गावातून आतापर्यंत चार क्लास वन अधिकारी झालेले आहेत. दीपक सवडे यांच्या माध्यमातून पाचवा क्लास वन अधिकारी गावाला मिळाला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाच हजार लोकसंख्येच्या गावातून जवळपास साडेतीनशे जण विविध शासकीय नोकऱ्यांमध्ये असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी मानव सेवा मंडळाचे संजय राऊत यांनी सांगितले की, दीपकचे यश ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. प्रबळ इच्छा शक्तीवर यश संपादन करणे कठीण नसते हे दीपक सवडे यांनी दाखवून दिले आहे.

सत्कारला उत्तर देताना दीपक सवडे यांनी सांगितले की आपल्या यशामध्ये आई-वडिलांचा मोलाचा वाटा आहे. घरची परिस्थिती बिकट असतानाही आई-वडील, बहीण व भाऊजी यांनी शिकण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन दिल्याने आपण हे यश संपादन करू शकलो असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाला मानव मंडळाचे प्रांत सचिव नसीम शेख, संजय राऊत, दत्तू म ुनेमानिक, संजय निकम, प्रदीप जैस्वाल, गजानन डोमळे, बालाजी मगर, गोविंद जाधव, अकोला देवचे माजी सरपंच रघुनाथ कदम, सामाजिक कार्यकर्ते भाऊराव आटपळे, योगेश सवडे, तलाठी ज्ञानेश्वर सोळंके, तलाठी सुनील निर्मल, लक्ष्मण सवडे, बी.डी. सवडे, बालाजी मोढेकर, गजानन सवडे, दिलीप सकुंडे, भगवान शितोळे, सिद्धेश्वर लंगोटे, स्वाती सोळुंके, नंदा सवडे, बाबुराव सवडे, गजानन सवडे, प्रियंका सवडे, पंकज सवडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊराव आटपाळे यांनी केले तर आभार सिद्धेश्वर लंगोटे यांनी मानले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.